| MHWR080018862023 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०८.०८.२०२३ |
| | नोंदणी दिनांक | : | ०८.०८.२०२३ |
| | निकाल दिनांक | : | ०३.०६.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०२ ०९ २६ |

**भाग– अ**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ आर्वी यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एन.जे.देशमुख)**

**न्यायनिर्णय**

(घोषीत दिनांक ०३.०६.२०२६)

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक १०६/२०२३ नि.क्र.**

गुन्हा नोंद क्र.४८३/२०२३, पोलीस स्टेशन आर्वी.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष/फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन,आर्वी,<br>तह. आर्वी, जि. वर्धा |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्रीमती व्ही.एस.शेंडे |
| आरोपी | अनिल पुंडलिक प्रधान,<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. मायाबाई वार्ड, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ/अधिवक्ता | श्री. डी.टी.मोटवानी |

**भाग–'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १६.०४.२०२३ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १७.०४.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०८.०८.२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चिती दिनांक | १८.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०३.०६.२०२६ |
| शिक्षा सुनावनीचा दिनांक | निर्दोषमुक्त |

**आरोपीचा तपशील**

| अनु क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असतांना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अनिल पुंडलिक प्रधान | १९.०४. २०२३ सुचनापत्रा वर सोडले | १८.११. २०२५ | भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | -- | -- |

**भाग – क**

**अभियोगपक्ष/बचाव पक्ष/न्यायालय साक्षीदार यांची यादी**

**अ ) अभियोगपक्ष साक्षीदार**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप ( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सौरभ गणेशराव कोहळे | जखमी/फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | विनोद गणपत नेवारे | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | शेख राजीक शेख अलताफ | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |

ब) बचावपक्ष साक्षीदार, जर असतील तर,

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| -- | -- | --- |

क) न्यायालय साक्षीदार, जर असतील तर,

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>( प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| -- | -- | --- |

## अभियोगपक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांच्या निशाणी क्रमांकाची यादी

अ ) अभियोगपक्ष,

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १) | १० | तोंडी रिपोर्टवरील सहीला |
| २) | ११ | छापील प्रथम खबर अहवालावरील सहीला |
| ३) | १३ | सुचनापत्रावरील सहीला |
| ४) | १४ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |
| ५) | १५ | जप्ती पंचनाम्यावरील सहीला |
| ६) | १७ | सूचनापत्रावरील सहीला |
| ७) | १८ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |
| ८) | १९ | जप्ती पंचनाम्यावरील सहीला |

ब) बचाव पक्ष,

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | --- |

**क) न्यायालय निशाणी ,**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | -- | --- |

**ड) भौतीक वस्तु/मुद्देमाल,**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १) | पोलीस ठाणे नोंदवही क्र.६७/२०२३ | लोखंडी सळाख |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०३.०६.२०२६ रोजी घोषीत)

आरोपीच्या विरोधात भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरुन संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोगपक्षाचे कथन सारांशाने पुढीलप्रमाणेः-**

२) श्री. सौरभ गणेशराव कोहळे (यानंतर थोडक्यात फिर्यादी असे नमुद) हा मायाबाई वार्ड, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा येथे राहतो व मजुरीचे काम करतो. दिनांक १६.०४.२०२३ रोजी अंदाजे रात्री ०९.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी व त्याचा मित्र सुरज लांडगे असे मिळुन गांधी चौकातुन घराकडे परत येत असतांना दगडी पूलाजवळ आरोपी त्यांना भेटला होता, तेव्हा फिर्यादीचा मित्र सुरज लांडगे हा फिर्यादीला बोलला होता की, 'आरोपी हा त्याच्या ओळखीचा असल्याने व तो कटला घेऊन पडल्याने त्याला मार लागला आहे, व आपण त्याला त्याचे घरी सोडून देऊ'. त्यानंतर, फिर्यादीने व त्याच्या मित्राने त्याला घरी सोडून देऊ का असे विचारले होते, तेव्हा आरोपी त्यांना शिवीगाळ करु लागला होता, तेव्हा फिर्यादीचा मित्र नामे सुरज लांडगे याने आरोपीला एक चापट मारली होती व त्यावेळी आरोपीच्या कटल्याला लावुन असलेला लोखंडी सळाख काढुन फिर्यादीच्या डोक्याला मारला होता, त्यामुळे फिर्यादी जखमी झाला होता व खाली पडला बसला होता. त्यावेळी, तिथे उभे असलेले संदिप बोरकर, प्रज्वल मेंदरे, रजित हूमे व ईतर लोकं आले होते व त्यांनी त्यांचा वाद सोडविला होता व फिर्यादी घरी जाऊन त्याच्या

परिवारवाल्यांनी त्याला सरकारी दवाखान्यात नेले होते. सबब, फिर्यादीने आरोपींच्या विरोधात संबंधीत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती.

३) सदर फिर्यादीवरुन आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन, आर्वी येथे अपराध क्र.४८३/२०२३, भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ प्रमाणे नोंदविण्यात आला. तपासादरम्यान, तपासी अधिकारी श्री. रविंद्र खरे, ब.नं.७६२ यांनी साक्षीदारांची बयाने त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा पंचासमक्ष तयार केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपीला सुचनापत्रावर सोडले. तपासाअंती, पोलीसांनी आरोपीच्या विरोधात भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ प्रमाणे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४) मी आरोपी विरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचे निशाणी क्र.०५ वर गुन्हयांचे दोषारोप निश्चित केले व ते आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजाऊन सांगण्यात आले. आरोपीने त्याचे प्रतिकथन नि.क्र.०६ अन्वये त्याचे विरुध्द ठेवण्यात आलेले आरोप नाकबुल करुन संपरिक्षेची मागणी केली.

५) आरोपीचे विरुध्द गुन्हयात गुंतविणारा पुरावा न आल्याने फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये अभिप्रेत असलेला आरोपींचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

६) अभियोगपक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्रीमती व्ही.एस.शेंडे आणि आरोपीतर्फे त्याचे अधिवक्ता श्री.डी.टी.मोटवानी यांचा युक्तिवाद ऐकला.

७) खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष व त्या निष्कार्षामागील कारणे खालीलप्रमाणे आहेतः-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक १६.०४.२०२३ रोजी अंदाजे रात्री ०९.०० ते ९.३० वाजताच्या दरम्यान मौजा-मायाबाई वार्ड, आर्वी, | नाही |

| | | |
|---|---|---|
| | तह. आर्वी, जि. वर्धा येथे आरोपीने फिर्यादीला लोखंडी रॉडने मारुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली, ज्यामुळे त्याचा मृत्यु सुध्दा संभव होता, व त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ प्रमाणे शिक्षेस पात्र होणारा अपराध केला? | |
| २) | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वर नमुद तारीख, ठिकाणी व वेळी, आरोपीने फिर्यादीकडून सार्वजनिक शांतता भंग व्हावा अथवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने त्यांना प्रक्षोभित करुन अपमान केला व त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ प्रमाणे शिक्षेस पात्र होणारा अपराध केला? | नाही |
| ३) | आदेश काय? | आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## - <u>कारणमिमांसा</u> -

**<u>मुद्दे क्रमांक १ व २ करीता :-</u>**

८) प्रकरणात उपरोक्त साक्षीदारांनी दिलेल्या पुराव्यांचा विचार करता तसेच मुद्दे क्र.१ व २ हे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांनी पुनरावृत्ती (repetition) टाळण्याकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रीतरित्या करणे सोयीचे व इष्ट होईल म्हणुन ते एकत्रीत चर्चिले आहेत.

९) अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी फिर्यादी (सा.क्र.१,नि.क्र.०९), विनोद (सा.क्र.२,नि.क्र.१२) व शेख राजीक(सा.क्र.३,नि.क्र.१६) यांना साक्षीदार म्हणून तपासलेले आहेत. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, फिर्यादी व साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाहीत, त्यामुळे अभियोगपक्षाने त्यांची उलटतपासणी घेतली, परंतु त्यांच्या उलटतपासणी मधुन अभियोगपक्षास सहकार्य ठरेल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर खटल्यात फिर्यादी व साक्षीदारांनी घटनेबाबत अनभिज्ञता दर्शविल्यामुळे फिर्याद, छापील प्रथम खबर अहवाल व

बयानामधील केलेले कथन आरोपीविरुध्द शाबित झालेले नाहीत. फिर्यादीचे कथन आहे की, आरोपी हा त्याच्या घराच्या शेजारी राहत असल्यामुळे त्याचेसोबत आता त्याचे संबंध चांगले व सलोख्याचे असून बोलणे सुरु आहे तसेच त्याची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झालेली आहे तसेच त्याची आरोपी विरुद्ध आता काहीही तक्रार राहीली नाही तसेच त्याला आरोपी विरुध्द खटला पुढे चालवायचा नाही. याशिवाय, आरोपीने फिर्यादीला लोखंडी सळाखने मारले होते, तसेच शिवीगाळ केल्याचे सपशेल नाकारलेले आहे. फिर्यादीचे अशा प्रकारचे कथन विचारात घेता असे दिसते की, आरोपीविरुध्द दोषारोपाप्रमाणे गुन्हा सिध्द होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोगपक्ष असफल ठरला आहे. त्यामुळे आरोपी विरुध्द सबळ पुरावा उपलब्ध न झाल्यामुळे आरोपीने अभियोगपक्षाने कथन केल्याप्रमाणे गुन्हा केल्याचे दिसून येत नाही.

१०) याशिवाय, विनोद (सा.क्र.२) व शेख राजीक (सा.क्र.२) हे घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाहीत, त्यामुळे अभियोगपक्षाने त्यांची उलटतपासणी घेतली, परंतु त्यांच्या उलटतपासणी मधुन अभियोगपक्षास सहकार्य ठरेल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही, त्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबित झालेला नाही.

११) अभिलेखावरील दाखल करण्यात आलेले वैद्यकीय प्रमाणपत्र जरी आरोपीच्या वतीने मान्य करण्यात आले असले तरी त्यावरुन असे शाबीत होत नाही की, आरोपीने फिर्यादीला लोखंडी सळाखने मारल्यामुळे सदर जखमा झाल्या होत्या. याशिवाय अभिलेखावर इतर असा कोणताही पुरावा नाही की, जेणेकरुन असे शाबित होईल की, आरोपीने घटनेच्या दिवशी फिर्यादीला लोखंडी सळाखने मारल्यामुळे सदर जखमा झाल्या होत्या. अशा परिस्थितीत असा निष्कर्ष काढण्यास काही हरकत नाही की, आरोपीचा सदर घटनेमध्ये सहभाग दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दे क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता :-</u>**

१२) मुद्दे क्रमांक १ व २ करीता नोंदविण्यात आलेल्या कारणमिमांसेचा विचार

करता अभियोगपक्षाने आरोपीच्या विरोधात असलेले आरोप संशया पलिकडे सिध्द केलेले नाही, त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. सबब, आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. याशिवाय, अभिलेखावरुन असे दिसुन येते की, तपासादरम्यान, तपासी अधिकारी यांनी लोखंडी सळाख जप्त केलेली होती. सदरची लोखंडी सळाख ही मुल्यहीन असल्यामूळे अपिल कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करणे न्यायोचित ठरेल. सबब मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

१) आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ प्रमाणे होणा-या शिक्षेस पात्र आरोपातुन, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे व आरोपीच्या जामीनदारास मुक्त करण्यात येत आहे.

३) जप्त मुददेमाल लोखंडी सळाख ही मुल्यहीन असल्यामूळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी.

४) आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी नव्याने रक्कम रुपये ५०,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन दाखल करुन अपीलात हजर राहण्याची हमी दयावी.

DESHMUKH NARESH JANRAO
Digitally signed by DESHMUKH NARESH JANRAO
Date: 2026.06.03 12:50:30 +0530

दिनांक :- ०३.०६.२०२६

(एन.जे.देशमुख)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, आर्वी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

Name of the Stenographer : V. S. Kharat